# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४
फोन – (०२३१) २५२१०३८, फॅक्स २५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com


जा.क्रं.शातंनिको/विवि/२०२१-२२/डीबीटीपोर्टल/मुदतवाढ/१९-२०,२०-२१,२१-२२/1691 दि- 05 MAY 2022

अत्यंत महत्वाचे-

## अंतिम दिनांक ३१-०५-२०२२ .

प रि प त्र क -

विषय – शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील प्रथम ,व्दितीय व तृतिय वर्षातील सर्व शाखामधील महाडीबीटी **प्रणालीमधील फॉर्म भरणे करीता(New/Renewal) मुदत वाढविण्यात आलेबाबत व आज पर्यंतही फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरणे बाबत व लॉगीनमध्ये रिव्हर्ट केलेले (Sent Back) अर्जातील कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करणे बाबत. ...(मुदतवाढ दि ३१/०५/२०२२ पर्यंत )**

संदर्भ – १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.शांतनिको/विवि/२०२१-२२/स्कॉलरशीप/ईबीसी/४३६२ दि.१६/१२/२१
२) महाडीबीटी पोर्टलवरील मूदतवाढीनुसार.

वरील विषयास अनुसरुन संस्थेतील सर्व शाखामधील सर्व प्रवर्गाच्या (EBC/SEBC/EWS, OBC, ST, SC,VJNT,SBC, MINORITY ) विद्यार्थ्यांकरीता महाडीबीटी प्रणालीमधील अर्ज भरण्याकरीता दि ३०/०४/२०२२ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. तरी **संदर्भ क्रं ०२ नुसार कळविलेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता फॉर्म भरणेसाठी** -अंतिम दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यानी अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन अर्ज अंतिम दिनांकापर्यंत भरावेत .

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज रिव्हर्ट केलेले **(Sent Back)** आहेत, त्यांनीही वरीलप्रमाणे अंतिम दि ३१/०५/२०२२ पर्यंत अर्जातील कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करुन अर्ज पुन्हा महाडीबीटी प्रणालीव्दारे मंजुरीकरीता पाठविण्यात यावेत, अन्यथा भविष्यात उदभवणा-या अडचणीस सर्वस्वी संबंधित विद्यार्थी जवाबदार राहतील व रु ३०००/- किंवा रु ६०००/- शिक्षण शुल्क भरण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते आधार कार्डशी लिंक नाही अशा विद्यार्थ्यांनी त्वरीत आधार कार्ड स्वतः च्या बँक खात्याशी एनपीसीआय मॅपर मधून लिंक करावे अन्यथा शिष्यवृत्तीची रक्कम त्यांचे खात्यावर जमा होणार नाही याची नोंद घ्यावी.

सर्व प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी त्रुटी पाहण्याकरीता सुचना खालील प्रमाणे ...

⇩

**My Applied Scheme Application ID**

वर क्लिक करुन मेसेज बॉक्स मध्ये शेवटी ज्या त्रुटी दिलेल्या आहेत त्या दुरुस्त करुन फॉर्म पुन्हा Reapply करावा . Server Down असल्याने लगेच त्रुटी दिसत नाहीत तरी ४-५ वेळा प्रयत्न केल्यावर त्रुटी दिसतात.

तसेच विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ घेणेचा आहे याची नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन ,कोल्हापूर.

प्रत- मुख्य सूचना फलकावर विद्यार्थ्यांचे माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत- श्री. इंगळे, प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.**

सर्व वर्ग शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या whatsapp समुहावर पाठवावे.